अधिसूचना कलम -११

क्र.२०१८/उपजिअ/भू/पात/लसिंका/क्रं.२/सिआर-०२

उपजिल्हाधिकारी (भूसं)पातलसिंका क्र.२ नांदेड.

दिनांक १०/१०/२०१८

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम - २०१३

ज्याअर्थी, भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम - २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.संकिर्ण ११/२०१४/ प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम (३) च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्रकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, नांदेड जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनसाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे;

आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी कलम ४३ च्या पोट कलम(१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर या अनुसूचीमध्ये तपशिल नमूद करावा);

त्याअर्थी, आता असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही. परंतू, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतू आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम -२०१३ (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करण्यात असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) पातलसिंका क्र.२ नांदेड यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची एक

जमिनीचे वर्णन

गावः मौ. करखेली, तालुकाः- धर्माबाद जिल्हाः नांदेड

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्र. | क्षेत्र हे.आर. मध्ये |
|---|---|---|
| ०१ | ७६१ | ०.२२ |
| ०२ | ७६१ | ०.०६ |
| ०३ | ७६१ | ०.०६ |
| ०४ | ७६१ | ०.१४ |
| ०५ | ७६१ | ०.१२ |
| ०६ | ७६० | ०.०७ |
| ०७ | ७६० | ०.११ |
| ०८ | ७६० | ०.०१ |
| ०९ | ७६० | ०.१५ |
| १० | ६९९ | ०.१४ |
| ११ | ६९४ | ०.२० |
| १२ | ६९२ | ०.१७ |
| १३ | ६९१ | ०.१४ |
| १४ | ६८८ | ०.०९ |
| १५ | ६८९ | ०.१५ |
| १६ | ६६३ | ०.२० |
| १७ | ६६३ | ०.१२ |
| १८ | ६६३ | ०.०९ |
| १९ | ६५२ | ०.२३ |
| २० | ७५३ | ०.०३ |
| २१ | ७५४ | ०.१४ |

| | | |
|---|---|---|
| २२ | ७५५ | ०.१६ |
| २३ | ७५६ | ०.१२ |
| २४ | ७५७ | ०.१५ |
| २५ | ७५८ | ०.१० |
| २६ | ७५८ | ०.१० |
| २७ | ७५९ | ०.०७ |
| २८ | ७५९ | ०.०७ |
| २९ | ७६० | ०.११ |
| ३० | ७१० | ०.२० |
| ३१ | ७१० | ०.१४ |
| ३२ | ७४९ | ०.४६ |
| ३३ | ७११ | ०.१३ |
| ३४ | ७११ | ०.१४ |
| ३५ | ७२४ | ०.२० |
| ३६ | ७२८ | ०.१२ |
| ३७ | ७२८ | ०.१३ |
| | एकूण क्षेत्र | ५.०४ |

अनुसूची दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांवः- इसापूर उजव्या कालवा पुच्छ शाखा कालव्यावरील आर. एम.-१ तसेच आर. एम-२ व यावरील सबमायनर तसेच धर्माबाद शाखा कालव्यावरील आर. एम.-१ साठी मौ. करखेली ता. धर्माबाद जि. नांदेड.

समाजाला मिळणारे लाभः- जलसिंचनाच्या पायाभूत सुविधेमध्ये भर पडत आहे.

अनुसूची तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्याची आवश्यकता नाही.

अनुसूची चार

भूसंपादन जनतेच्या पायाभूत सुविधासाठी होत असल्याने सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाचा अभिप्राय आवश्यक नाही.

अनुसूची पाच

प्रशासकाची नियुक्ती करणे आवश्यक नाही.

टिप - उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) पातलसिंका क्र.२ नांदेड येथील कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांकः-१०/१०/२०१८

ठिकाणः नांदेड

(सुनिल महिंद्रकर)

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)

पातलसिंका क्र.२ नांदेड.